नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 09/02/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील जसापुर शिवार येथे दिनांक 04/02/2021 चे 08:30 वा. दरम्यान आरोपी पती/मृतक नामे– सतिश संभाजी किरनाके, वय 48 वर्ष, रा. तरोडा.त.जि.वर्धा, ह.मु प्रसाद कॉलनी बुटटीबोरी जयसिंग उईके यांच्या घरी किरायाने हा व त्याची पत्नी हे आपले एम.एच–49/वाय–8026 क्रमांकाच्या ॲक्टीवा गाडीने बुटटीबोरी वरून झरगड जि.यवतमाळ येथे मयती साठी हिंगनघाट मार्गे रोडने जात होते. त्यादरम्यान गाडी फिर्यादीचे पती चालवित असतांना त्याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने गाडी एकदम रोडचे खाली उतरल्याने गाडी वरून दोघेही खाली पडले. या अपघातात फिर्यादी या जखमी झाल्या तर आरोपी याचे डोक्याला मार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना समुद्रपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषीत केले. पो.शि बाबा नेवारे पो.स्टे बेला यांनी पो.स्टे समुद्रपुर येथे रवाना होवुन परत येवुन मर्ग क्र. 00/21 कलम 174 जाफौ प्रमाणे कागदपत्र पो. स्टे. बेला येथे आणुन पेश केल्याने सदर कागदपत्रावरून गुन्हा नोंद.

फिर्यादी नामे– सौ.लता सतिश किरनाके, वय 45 वर्ष, रा. तरोडा.त.जि.वर्धा, ह.मु प्रसाद कॉलनी बुटीबोरी जयसिंग उईके यांच्या घरी किरायाने हिने दिलेल्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राहुल ठेंगणे 7972812569 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर